क्र.मरारविम/०२/प्रशासन/ ९८६

दिनांक :- 10 JAN 2017

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

## परिपत्रक

विषय :- या महामंडळाकडून प्रतिनियुक्ती कालावधी व्यतिरिक्त इतर कालावधीतील वेतन व भत्ते, महागाई भत्ता तसेच वेतना संदर्भातील देय इतर फरकाची रक्कम अदा करण्याबाबत.

या परिपत्रकाद्वारे सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की, हे महामंडळ सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय अंतर्गत येणारे सार्वजनिक उपक्रम असून या महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते महाराष्ट्र राज्य एकत्रित निधीमधून (Consolidated Fund ) अदा केले जात नसून बँकेमार्फत महामंडळाच्या स्वत:च्या निधीमधून अदा केले जात आहे.

या महामंडळात शासनाकडील वेगवेगळया विभागाकडील अधिकारी / कर्मचारी यांची प्रतिनियुक्तीने विहित कालावधीसाठी शासनामार्फत नियुक्ती केली जाते. सदर अधिकारी / कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ अन्वये, परसेवा / प्रतिनियुक्ती नियम क्रं.३८, ३९ व ४० परिशिष्ट-II (नियम ४०) मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९, मधील नियम १५.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिनियुक्ती कार्यालयाकडून ज्या दिवशी अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्त होतात त्या दिवसापासून त्यांना कार्यमुक्त करेपर्यंतच्या कालावधीचे वेतन व भत्ते, इतर भत्ते, महागाई भत्ता फरक, पुर्नवेतन निश्चिती फरक, वैद्यकीय देयक, आश्वासित प्रगती योजना अंतर्गत देय फरक रक्कम इ. शासन धोरणानुसार महामंडळाकडून अदा केले जाते.

प्रतिनियुक्ती कालावधी व्यतिरिक्त (त्यापूर्वीचा अथवा कार्यमुक्त झाल्यानंतरचा कालावधी) इतर विभागाकडील / कार्यालयाकडील त्यांना देय होणारे कुठलेही फरक रक्कम या महामंडळाकडून अदा करण्यात येत नाही व करण्यात येणारही नाही. यास्तव प्रतिनियुक्ती कालावधी व्यतिरिक्त इतर कालावधीतील त्यांना देय होणाऱ्या कुठल्याही वेतन व भत्ते संदर्भातील उपरोक्त नमूद केलेल्या बाबींसंदर्भात फरकाची रक्कम याबाबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे स्तरावरुन संबंधीत शासन विभागाकडे / नियंत्रक अधिकारी किंवा शासन कार्यालयाकडे परस्पर संपर्क साधावा.

अधिकारी / कर्मचारी यांचा प्रतिनियुक्ती कालावधी पूर्ण झाल्यानंतर तसेच इतर ठिकाणी बदली झाली असल्यास बदलीनंतर त्यांना या महामंडळाकडून देय होणाऱ्या प्रतिनियुक्ती कालावधीतील वेतन व भत्ते, महागाई भत्ता तसेच इतर कुठल्याही वेतन संदर्भातील फरकाची रक्कम या महामंडळाकडून अदा करावयाची असल्यास सदर अधिकारी / कर्मचारी यांनी ते सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाकडून " प्रतिनियुक्ती कालावधीतील त्यांना देय होणाऱ्या फरकाची रक्कम शासन नियमानुसार अदा करण्यात आलेली नाही व यापुढे अदा करण्यात येणारही नाही ", असे प्रमाणपत्र या महामंडळास सादर करणे आवश्यक आहे.

सदर परिपत्रक उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेने निर्गमीत करण्यात येत आहे.

( मंगेश शिंदे )
मुख्य प्रशासकीय अधिकारी
म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.

प्रती,

प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई / शिबीर कार्यालय पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती , वाशिम.

प्रत माहितीस्तव --

१. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
२. सह व्यवस्थापकीय संचालक (२), म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
४. व्यवस्थापक (लेखा), म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
५. उप व्यवस्थापक (लेखा / वित्त), म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
६. सहाय्यक व्यवस्थापक (मा.सं.), म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
७. सर्व लेखा अधिकारी, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
८. सर्व कक्ष अधिकारी (प्रशासन), म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई.
९. प्रणाली प्रशासक, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई - यांना सदर प्रत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यासाठी.
१०. दस्तऐवज अधिकारी, म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई - यांना ग्रंथालय प्रतीसाठी.
११. निवड नस्ती.

D:\Shruti\Shetti Sir\वेतन फरक - परिपत्रक.docx

निगम कार्यालय : वांद्रे रेक्लेमेशन डेपोसमोर, लिलावती हॉस्पिटल जवळ, के. सी. मार्ग, वांद्रे (प), मुंबई – ४०० ०५०.
दुरध्वनी : ०२२-२६४००१९०/२०१, २६५५८१७५/७६, फॅक्स : ०२२-२६४१७८९३

नोंदणीकृत कार्यालय : नेपियनसी रोड, प्रियदर्शिनी पार्क शेजारी, मुंबई – ४०० ०३६
दुरध्वनी : ०२२-२३६८६११२,२३६९६१०९/३६७१/३६७३, फॅक्स : ०२२-२३६८४९४३
वेबसाईट : www.msrdc.org, सीआयएन : U45200MH1996SGC101586

Scanned by CamScanner